ई-मेल / रजिष्टर पोष्टाद्वारे

**शिक्षण सेवक (प्रशिक्षित) या पदावर**
**नियुक्ती देणेबाबत.. (उर्दू माध्यम)**
**प्राथमिक स्तर (इ.1 ली ते 5 वी)**
**श्रीम. मुस्कान मजहर पठाण व इतर 01**

ZPAHM-19012(11)/34/2026-PEDU
जिल्हा परिषद अहिल्यानगर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद आदेश क्र.कार्या-1/पीई-1/3588474/ 1180 /2026
अहिल्यानगर, दिनांक 15 / 09 / 2026

वाचा :-
1) ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र. जेपीटी 1480/19667/3444/12 दिनांक 14 मे 1986
2) शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र. एसएसएन-1099/(340/99) / माशि-2 दि. 13 ऑक्टोबर 2000
3) महिला व बालविकास विभाग,मंत्रालय मुंबईकडील शासन निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000 /प्रक्र-415/का-2 दिनांक 25 मे 2001
4) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.पीआरई/2002/(3395)/प्राशि-1 दिनांक 27 फेब्रुवारी 2003
5) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/2001/39 दि. 19 मार्च 2003
6) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील अंनियो/1005/126/सेवा-4 मुंबई दि.31 ऑक्टोबर 2005
7) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.सेनिवे-1008/16/सेवा-4 दिनांक 26 फेब्रु. 2008
8) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.भूकंप-1009/प्र.क्र.207/2009/16-अ दि. 27 ऑगस्ट 2009
9) शासन निर्णय क्र.पअंक-1009/प्र.क्र.200/2009/16-अ दि.27 ऑक्टोबर 2009
10) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक सीबीसी- 10/2010/ प्र.क्र.47/ मावक/5 दिनांक 26 मार्च 2010
11) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीबीसी 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि. 12/12/2011
12) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई-1713/(86/13)/प्राशि-5, दि.19 जुन 2013
13) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-2015/प्र.क्र.404/का-12 दि.25 एप्रिल 2016
14) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.राक्रीधो-2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दि.1 जुलै 2016
15) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. वेतन1216/प्र.क्र.123/16/टिएनटी-3, दि. 13 ऑक्टोबर 2016
16) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-2018/प्र.क्र.311/टीएनटी-1 दि. 01 जानेवारी 2019
17) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. सीईटी 2015/प्र.क्र.149/टीएनटी-1दि. 07 फेब्रु. 2019
18) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण 2018/प्र.क्र.397/टीएनटी-1 दि. 07 फेब्रुवारी 2019
19) शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-2018/प्र.क्र.397/ टीएनटी-1 दि. 25 फेब्रुवारी 2019
20) शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र.जिपब 4819/प्र.क्र.201/आस्था-14, दि.25 फेब्रुवारी 2019
21) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-2018/प्र.क्र.397/ टीएनटी-1 दि. 16 मे 2019
22) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. दिव्यांग 2018/प्र.क्र.114/16-अ, दि.19 मे 2019
23) शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-2018/प्र.क्र.397/ टीएनटी-1 दि. 12 जुन 2019
24) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण 1716/प्र.क्र.18/क्रीयुसे-2,दि.30 जुन 2022
25) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2022/प्र.क्र.106,टिएनटी-1,दि.10 नोव्हे. 2022

Scanned by CamScanner

26) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2020/प्र.क्र.260,टिएनटी-1,दि.7 फेब्रु. 2023
27) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सनिव 2023/प्र.क्र.14/कार्या12,दि. 3 मार्च 2023
28) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अमुजा-2022/प्र.क्र.122/का-3,दि. 6 एप्रिल 2023
29) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.174,टिएनटी-1,दि.21 जुन 2023
30) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन पत्र क्र.संकीर्ण-2020/प्र.क्र.223,टिएनटी-1,दि.10 जुलै 2023
31) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन पत्र क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.509,टिएनटी-1,दि.13 ऑक्टोबर 2023
32) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीबीसी 2023/प्र.क्र.54/आरक्षण-5 दिनांक 11 फेब्रुवारी 2026
33) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक 01/01/2026, दि. 20/01/2026, दि. 30/03/2026, दि. 02/04/2026 व दिनांक 24/07/2026
34) मा. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र शासन, शासन पत्र क्र. मरापप/पवित्र पोर्टल/2415935/2026 दि. 17 मार्च 2026
35) मा. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र शासन, शासन पत्र क्र. मरापप/पवित्र पोर्टल/जाहिरात/टेट 2025/ 2812596/ 2026 दि. 08 मे 2026
36) मा. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र शासन, शासन पत्र क्र. मरापप/पवित्र पोर्टल/पदभरती//2026 दि. 28 ऑगष्ट 2026
36) पदस्थापने बाबत समुपदेशन प्रक्रिया दिनांक 09/09/2026

## - :नियुक्ती पत्र :-

आपणास कळविणेत येते की, आपली शिक्षण सेवक म्हणून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत खालील नमूद केलेल्या शाळेमध्ये पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र | उमदेवारांचे नांव | विषय | शिकविण्याचे माध्यम | निवडीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | पदस्थापनेचे ठिकाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शाळा | तालुका |
| 1 | 2 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | मुस्कान मजहर पठाण | सर्व विषय | उर्दु | इ. मा. व. | सर्वसाधारण | सोनई नं.4 उर्दु | नेवासा |
| 2 | शारीब अहमद शेख अनिस | सर्व विषय | उर्दु | वि.जा. - अ | सर्वसाधारण | साकुर उर्दु | संगमनेर |

**<u>नेमणुकीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-</u>**

1) शिक्षण सेवक म्हणून आपली नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधीन असेल. त्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत विहित नमुन्यातील हमीपत्र आपण लिहून दिल्यानंतरच आपणांस शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती दिली जाईल.
2) उमेदवाराने पवित्र पोर्टलवर स्वप्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहिती सत्य गृहीत धरून आपणास नियुक्ती देण्यात येत आहे. तथापि स्वप्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहिती खोटी अथवा विसंगत आढळल्यास कोणत्याही टप्प्यावर आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.
3) नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसात रूजू न झाल्यास आपली नियुक्ती रद्द झाली आहे असे समजून आपले नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल.
4) शिक्षण सेवक म्हणून नियुक्तीचा कालावधी 3 वर्षे इतका राहील. तसेच शिक्षण सेवकांना दिर्घ सुट्टीसह पूर्ण शैक्षणिक वर्षातील 12 महिन्याचे मानधन अनुज्ञेय राहील.
5) शिक्षण सेवकाला सेवेत सामावून घेण्यासाठी शिक्षण सेवक या पदावर 3 शैक्षणिक वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर संबंधित उमेदवाराला प्राथमिक शिक्षकांच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यात येईल.
6) 3 वर्षाची गणना करतांना प्रत्येक वर्ष हे जून ते एप्रिल असे धरण्यात येईल. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबईकडील शासन निर्णय क्र.पीआरई-2002/3395/ प्राशि-1 दिनांक 27 फेब्रुवारी 2003, जोडपत्र-अ मधील परिच्छेद 14 अन्वये अनुज्ञेय धरलेला अनुपस्थितीचा कालावधी वगळता अन्य अनुपस्थितीचा कालावधी कर्तव्यार्थ कालावधी म्हणून गणला जाणार नाही.

Scanned by CamScanner

7) शिक्षण सेवक म्हणून आपणास अहमदनगर जिल्हा परिषदेच्या कोणत्याही प्राथमिक शाळेत काम करावे लागेल.
8) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरूपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.
9) नियमित स्वरूपात नियुक्ती केलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या किंवा शासकीय कर्मचा-यांच्या सुविधा आपणास देय असणार नाहीत.
10) आपणास राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिन्याची नोटीस द्यावी लागेल राजीनामा दिल्यास अथवा मध्येच नोकरी सोडून दिल्यास मागील सेवेचा फायदा 3 वर्षाचा कालावधी परिगणीत करताना मिळणार नाही.
11) प्रशिक्षित शिक्षण सेवक म्हणून आपणास दरमहा रूपये 16,000/- एवढे मानधन दिले जाईल.
12) नियुक्तीच्या कालावधीत आपणास खालील कर्तव्य पार पाडावी लागतील.
a) संबंधित गावातील शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करून घेण्याच्या तसेच विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती टिकविण्याच्यादृष्टीने पालकांशी संपर्क ठेवणे.
b) शाळेमध्ये दररोज संपूर्ण शालेय कालावधीमध्ये नियमित व वेळेवर उपस्थित राहणे.
c) अभ्यासक्रमामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते शैक्षणिक साहित्य निर्माण करणे.
d) नेमून दिलेल्या वर्गाचे विहित कार्यपध्दतीनुसार अध्यापन करणे.
e) शासनाने आवश्यक केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहणे.
f) शाळेचे मुख्याध्यापक,केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करणे व शैक्षणिक बाबीबाबत त्याच्या आदेशाचे पालन करणे.
g) वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन करणे.
h) शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या (क्रीडास्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा इत्यादी)आयोजनामध्ये सहभागी होणे.
13) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे या कार्यालयाकडून आपले डी.एड चे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र, टीईटी/सीटीईटी प्रमाणपत्र यांची पडताळणी करून ते वैध असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच आपली नियुक्ती पुढे चालू राहील.अन्यथा आपली सेवा समाप्त करण्यात येईल.
14) शिक्षण सेवक पदावर रुजू झालेच्या दिनांकापासून दोन महिन्याचे आत जिल्हा शल्य चिकित्सक अहमदनगर यांचेकडील शारिरिक दृष्टया पात्रते संबंधीचे वैद्यकीय प्रमाणपत्र नेमणुकीचे कार्यालयास सादर करणेत यावे.
15) महाराष्ट्र शासन साप्रवि कडील क्र./व्हीसीए.1093/1499/प्र.क्र.-59/16-अ,दि.09/03/1997 मधील सुचनेनुसार सदरची नियुक्ती चांगले चारित्र्य असणे या अटीवर देण्यात येत आहे. चारित्र्य पडताळणी कार्यालय प्रमुख यांनी सदर प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावेत व त्याची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. यामध्ये एखादी गंभीर बाब केव्हाही निदर्शनास आल्यास कोणतेही कारण न देता सेवा समाप्त करण्यात येईल.
16) जिल्हा परिषदेच्या सेवेत रुजू होण्यापूर्वी भारतीय संविधानास एकनिष्ठ राहण्याची शपथ शिक्षण विस्तार अधिकारी/मुख्याध्यापक यांचे समोर घ्यावी लागेल.
17) नेमणूकीच्या ठिकाणी हजर होणेकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.
18) आपण विवाहित असल्यास तुम्हाला एकच पती/पत्नी आहे असे गृहित धरुन नियुक्ती देण्यात येत आहे. एकापेक्षा जास्त पती/पत्नी असल्याचे निदर्शनास आल्यास तुमची सेवा समाप्त करण्यात येईल.
19) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम 2021 नुसार उमेदवाराने नियुक्तीचे वेळी खात्रीशीर कागदपत्री पुराव्यासह जन्म तारीख घोषीत करील. जेव्हा नियुक्तांची विहीत शैक्षणिक अर्हता ही माध्यमिक शालांत परिक्षा किंवा त्यावरील असेल, अशा बाबतीत, माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र हे वैध दस्ताऐवज असल्याचे मानण्यात येईल. अन्य बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थेचे निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र किंवा ज्या शाळेत तो शेवटी शिकत होता, अशा मान्यताप्राप्त शाळेचे प्रमाणपत्र हे वैध दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल.त्यानुसार उमेदवाराचे जन्म तारखेचे परिशिष्ठ-5 अ मध्ये हमीपत्र देईल. त्यानंतर खंड बी मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.
20) शिक्षण सेवक पदावर नेमणूक दिल्यानंतर शाळा/तालुका बदलून मिळण्यासाठी कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केल्यास अथवा दबाव आणल्यास आपणास कोणतेही कारण न देता आपली नियुक्ती रदद करण्यात येईल.
21) सदर नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपणास महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन परिपत्रक, शासन अधिसूचना तसेच वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी देतील अशा सर्व निर्देशाचे तंतोतंत पालन करणे आपणास बंधनकारक राहील.
22) कार्यालय प्रमुखांना खालील नामनिर्देशनपत्र देण्यात यावीत 1.वैद्यकीय दाखला , 2.जातीचा दाखला , 3.जातीचे वैधता प्रमाणपत्र, 4.स्वग्राम घोषणापत्र, 5.शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता प्रमाणपत्र मुळ सेवापुस्तक भरताना उपरोक्त कागदपत्रे डकविण्यात यावी ती डकविण्यात आली आहे किंवा नाही याची खात्री स्वत: करुन घ्यावी.
23) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/2001/39,दि.19 मार्च 2003 नुसार संगणक अर्हता/एम.एस.सी.आय.टी अथवा समक्ष परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र नियुक्ती मिळालेपासून दोन वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यानुसार खातेप्रमुख , कार्यालय प्रमख यांनी सदर कर्मचाऱ्यास कार्यमुक्त करावे.
24) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दि.01/07/2005 अन्वये दोन पेक्षा अधिक मुले असणाऱ्या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंब

Scanned by CamScanner

प्रतिज्ञापत्र) नियम 2005 नियुक्त्यासाठी अधिसूचनेत विहीत केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागू झालेली आहे. त्या अनुषंगाने सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना अ नुसार उमेदवाराकडुन प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखाने भरुन घ्यावे. सदर नियमानुसार दिनांक 28/03/2005 नंतर तिसरे अपत्य असणाऱ्या उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

25) आपण मागासवर्गीय असल्यास शासन निर्णय दि.12 डिसेंबर 2011 नुसार आपणास नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत जातपडताळणी समितीकडुन जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

26) शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्र./घभाम.1005/प्र.क्र.463/पापु 16 दिनांक 8 जुन 2006 अन्वये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करणेत आलेले आहे. त्यानुसार कार्यालय प्रमुख यांनी उमेदवाराकडुन शौचालय असलेबाबत व त्याचा वापर करीत असलेबाबत प्रमाणपत्र एक महिन्याचे आत घ्यावे.

27) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अंनियो/1005/126/सेवा/4, दि.31/10/2005 अन्वये दि. 01 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण / जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

28) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक रानियो-2022/प्र.क्र./34/सेवा-4, दिनांक 31/03/2023 अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीयनिवृत्ती प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुंटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान लागू होईल. त्याकरिता आपण शासन सेवेत नियुक्त झाल्यावर आठ दिवसाच्या आत विकल्प कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

29) महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अमुजा-2022/प्र.क्र.122/का-3,दि. 6 एप्रिल 2023 अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेकडुन अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करुन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

30) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.174,टिएनटी-1,दि.21 जुन 2023 अन्वये आपणास जिल्हा बदलीचा हक्क राहणार नाही,

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202609151600 73 असा आहे.

**आनंद भंडारी** (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रति,

संबंधित उमेदवार ----------------------------------,

प्रत :- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव रवाना.

1. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती --------------

   2/- संबधित नियुक्त शिक्षण सेवकांस नियमानुसार हजर करुन घेण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी. तसेच संबंधितांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी आपल्या स्तरावरुन करावी व त्यानंतरच संबंधितास रिक्त पदावर हजर करुन घ्यावे. संबंधिताचा हजर अहवाल या कार्यालयास सादर करावा.
2. गट विकास अधिकारी, पंचायत समिती --------------
3. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
4. संबंधित मुख्याध्यापक
5. निवडनस्ती

**आनंद भंडारी** (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

Scanned by CamScanner